माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : २८०४/२०२२**

**अपिलार्थी – श्री. संतोष दल्लू साबळे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहायक,**
**भारत राखीव बटालियन ०२, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १५, बिरसी कॅम्प, जि. गोंदिया**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा समादेशक,**
**भारत राखीव बटालियन ०२, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १५, बिरसी कॅम्प, जि. गोंदिया**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०१.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्रधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२२ | २२.०७.२०२२ | ०१.०८.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. २१.०४.२०२२** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मा. समादेशक कार्यालय, भा. रा. ब. ०२, रा. रा. पो.बल गट क्र. १५, गोंदिया येथील आवक नोंदवही दि. ११.०८.२०१६, कार्यालयीन अनुक्रमांक ६४९६-५६५ (B-Coy) अंतिम आदेशाची दिलेली शिक्षा रद्द होणेबाबत अपील केले होते त्या अपिलाची एक प्रत तसेच या अपिलाची आतापर्यत कोणत्याही प्रकारचे उत्तर मिळाले नाही किंवा आज्ञांकित कक्षेत हजर राहण्याबाबत का मिळाले नाही याचे कारण तसेच मा. पोलीस उपमहानिरीक्षक, रा.रा.पो. बल परिक्षेत्र, नागपूर यांचे कार्यालयास अपील पाठवल्यास जावक क्र. व नाही पाठवल्यास कारण याबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, "मा. समादेशक कार्यालय, भा. रा. ब. ०२, रा. रा. पो.बल गट क्र. १५, गोंदिया येथील आवक नोंदवही दि. ११.०८.२०१६, कार्यालयीन अनुक्रमांक ६४९६-५६५ (B-Coy) अंतिम आदेशाची दिलेली शिक्षा रद्द होणेबाबत नमद आहे परंत सदर आवक नोंदवहीमध्ये कोणत्याही प्रकारच्या आपल्याशी संबंधित माहितीचा उल्लेख

आढळून येत नाही. तरी, आपण मागितलेल्या माहितीचा स्पष्ट बोध होत नसून त्यामध्ये संभ्रम निर्माण होत आहे. करिता आपण मागितलेली माहिती ही कोणत्या शिक्षेबाबत आहे. याबाबत सविस्तर माहिती कळवावी, जेणेकरून माहिती देणे सोयीचे होईल", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. ०१.०८.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "कोणतेही उत्तर मिळाले नाही, मूळ अर्जावरील माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. ०२.०८.२०२१** रोजी "माहिती पूर्ण मिळालेली नाही, अपूर्ण माहिती दिली, माहिती मिळायला उशीर झाला" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १३.१०.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ३०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. संतोष दल्लू साबळे उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक / समादेशक सहायक, भा. रा. ब. ०२, रा. रा. पो.बल गट क्र. १५, गोंदिया, श्री. प्रमोद लोखंडे उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा समादेशक, रा. रा. पो.बल गट क्र. १३, गडचिरोली, श्री. विवेक मासाळ उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले कि, अपिलार्थी, श्री. संतोष दल्लू साबळे यांनी दाखल केलेल्या दि. २१.०४.२०२२ रोजीच्या जोडपत्रान्वये अंतिम आदेशाची दिलेली शिक्षा रद्द होणेबाबत केलेल्या अपिलावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला असून अपिलार्थी श्री. साबळे हे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, वडसा (देसाईगंज), जि. गडचिरोली येथे कार्यरत असताना दि. ३१.०१.२०१५ व दि. ०१.०२.२०१५ रोजी केलेल्या कथित अशोभनीय कृत्याबद्दल त्यांचेविरुद्ध कार्यवाही करण्यात आलेली असून त्याबाबतीतील अंतिम आदेश दि. १४.०६.२०१६ रोजी प्रत्यक्षात बजावण्यात आला. दरम्यान, अपिलार्थी, श्री. साबळे यांनी बी. कंपनी, भारत राखीव बटालियन ०२, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १५, बिरसी कॅम्प, गोंदिया येथे बदलीवर पाठविण्यात आले असून अंतिम आदेशाची झालेली शिक्षा रद्द होण्याबाबत त्यांनी केलेल्या अपीलासंबंधी माहिती ही जन माहिती अधिकारी, भारत राखीव बटालियन ०२, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १५, बिरसी कॅम्प, गोंदिया यांचेकडे दाखल करण्यात आली. त्यावर जन माहिती अधिकारी यांच्यावतीने अपिलार्थी यांनी मागितलेल्या शिक्षेबाबत कुठलाच तपशील आढळून येत नाही व मागितलेली माहिती कुठल्या शिक्षेबाबत आहे याविषयी जोडपत्र अ मध्ये कुठलाच खुलासा नसल्याचे नमूद करण्यात आले. याविरुद्ध अपिलार्थी, श्री. साबळे यांनी दि. ०१.०८.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून यावर प्रत्यक्षात सुनावणी ही प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे झाली नाही मात्र याबाबतीत संबंधित बटालियन येथील माहिती अधिकारी यांच्यावतीने उपलब्ध एक पृष्ठाची माहिती देण्याबाबत तयारी दर्शविण्यात आली आहे. याविरुध्द अपिलार्थी, श्री. साबळे यांनी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून यात दि. १६.०८.२०१६ रोजी अंतिम आदेशाची दिलेली शिक्षा रद्द होणेबाबत त्यांनी अपील केली असता यासंबंधातील अपील अर्ज हा उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र नागपूर यांच्याकडील कार्यालयाकडे अग्रेषित केला नसल्याचेही नमूद केले.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना बजावलेली शिक्षा ही राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, वडसा (देसाईगंज), जि. गडचिरोली येथून करण्यात आली असून त्यासंबंधातील अंतिम आदेश वगळता इतर कुठलीही माहिती ही

बटालियनच्या अभिलेखावर उपलब्ध नसून अपिलार्थी यांना जन माहिती स्तरावर संयुक्तिक उत्तर दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केल्याप्रमाणे आवक नोंदवही दि. ११.०८.२०१६ येथील कार्यालयीन अनुक्रमांक ६४९६-५६५ (B-Coy) यात नमूद केल्याप्रमाणे जर त्यांचेविरुद्ध पारित करण्यात आलेल्या अंतिम आदेशाविरुद्ध अपील केली असल्यास याबाबतीत विद्यमान समादेशक यांनी प्रशासकीय पातळीवर पडताळणी करून अशा स्वरुपाची अपील दाखल झाली असल्यास नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ३०.०१.२०२४**

जावक क्रमांक ---------898--------- दिनांक ------15 FEB 2024------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\2804-2022.docx